जळगाव (प्रतिनिधी) दि. २ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाच्या माध्यमातून विद्यापीठातील तसेच संलग्न महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी नामांकित औषधनिर्मिती कंपनी मॅक्लिओड्स फार्मास्युटिकल्स लिमिटेड (Macleods Pharmaceuticals Ltd.) यांची परिसर मुलाखत दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात आयोजित करण्यात आली होती. यात एकूण ४४ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

या निवड प्रक्रियेत वाणिज्य (कॉमर्स), बी.एस्सी., एम.एस्सी. (रसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, जैवतंत्रज्ञान, जैवरसायनशास्त्र), बी.फार्मसी, एम.फार्मसी, आयटीआय तसेच यांत्रिकी (डिप्लोमा अभियांत्रिकी) शाखेतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कंपनीतर्फे प्रतिनिधी म्हणून श्री. हिरेन पटेल व श्री. राजकुमार यांनी उपस्थित राहून निवड प्रक्रिया पार पाडली.

या अंतर्गत एकूण १०६ विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा व मुलाखत घेण्यात आली. त्यापैकी वाणिज्य – ०२, बी.एस्सी. – ०४, एम.एस्सी. – ०८, बी.फार्मसी – २८, आयटीआय – ०१ आणि यांत्रिकी (डिप्लोमा) – ०१ अशा एकूण ४४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना तत्काळ नियुक्तीपत्रे देण्यात आली.

या संपूर्ण उपक्रमाचे नियोजन व यशस्वी अंमलबजावणी केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाचे समन्वयक प्रा. उज्वल पाटील, उपसमन्वयक प्रा. रामेश्वर चव्हाण तसेच प्लेसमेंट अधिकारी सोनाली दायमा यांनी केले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे व कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**बातमी क्र. २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. २ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात प्राध्यापक प्रबोधिनी अंतर्गत 'समाजसेवक डॉ. बाबा आमटे' यांच्या जीवन चरित्रावर इंग्रजी विषयाच्या शिक्षण सहयोगी प्रीती मनुचारी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमप्रसंगी प्रशाळेचे संचालक प्रा. म. सु. पगारे अध्यक्षस्थानी उपस्थित होते.

प्रीती मनुचारी यांनी सांगितले की, कुष्ठरोगाकडे ज्या काळात अंधश्रद्धेच्या भूमिकेतून शाप अथवा पाप म्हणून पाहिले जात होते. एवढेच नव्हे तर कुष्ठरोग्यांना अशा प्रकारच्या गैरसमजातून सामाजिक व कौटुंबिक जीवनातून बहिष्कृत केले जात होते. त्या काळात बाबा आमटे यांनी 'आनंदवन' निर्माण करून कुष्ठरोग्यांची सेवा केली. या कार्यात त्यांची पत्नी डॉ. साधना आमटे यांनी देखील त्यांच्या खांद्याला खांद्या लावून सोबत केली. त्यांच्या कार्यामुळे कुष्ठरोग्यांमध्ये सकारात्मक विचारांची जागृती होऊन या रोगाकडे लोकांचा पाहण्याचा दृष्टिकोन बदलू लागला.

प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. म. सु. पगारे अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, कुष्ठरोगासारखे संसर्गजन्य आजार त्यांच्या संपर्कात येण्याची जोखीम पत्करून करुणेच्या भावनेतून त्यांची सेवा करणे हे खूप मोठे अद्वितीय कार्य बाबा आमटे यांनी केले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून आपल्या देशात अनेक समाजसुधारक होऊन गेले. त्यांच्यामध्ये बाबा आमटे यांचे कार्य दखलपात्र असून त्यांच्या कार्यातून संपूर्ण जगाला करुणे, मानवतेचा संदेश मिळतो असे सांगितले.

या कार्यक्रम प्रसंगी प्रशाळेतील प्राध्यापक डॉ. दीपक खरात, डॉ. भारती सोनवणे, डॉ. सुदर्शन भवरे, डॉ. प्रीती सोनी, खेमराज पाटील, प्रतिभा गलवाडे यांनी चर्चेत सहभाग घेऊन बाबा आमटे यांच्यासह अभय बंग, राणी बंग यांच्या कार्याविषयी तसेच परिसरातील सामाजिक कार्याविषयी चर्चा केली. या कार्यक्रमप्रसंगी इंग्रजी विभागातील सहाय्यक प्राध्यापक कृष्णा संदानशिव, मराठी विभागातील नेहा लाम्हणे, महेश सूर्यवंशी, पल्लवी बारी तसेच शिक्षकेतर कर्मचारी मनीष सोनार हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पल्लवी बारी तर आभार खेमराज पाटील यांनी मानले.

**बातमी क्र. ३**

जळगाव (प्रतिनिधी) दि. २ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठच्या नाट्यशास्त्र विभागाने राज्यस्तरावर आपली छाप पाडत नंदुरबार येथे आयोजित "हस्ती–जिभाऊ करंडक" एकांकिका स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले. "ऑलमोस्ट यू डाय" या एकांकिकेच्या प्रभावी सादरीकरणामुळे प्रथम क्रमांक पटकावत करंडकावर आपले नाव कोरले.

गाडगेबाबा शैक्षणिक सांस्कृतिक सेवा मंडळ, को-ऑप बँक लिमिटेड व रोटरी क्लब ऑफ नंदनगरी यांच्या संयुक्त विद्यमाने ही राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. राज्यभरातील विविध संघांनी सहभाग घेतला असून विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागाने उत्कृष्ट कलागुणांच्या जोरावर स्पर्धेत अव्वल स्थान मिळवले.

या एकांकिकेचे दिग्दर्शन समाधान मुर्तडक यांनी केले असून त्यांना उत्कृष्ट दिग्दर्शनाचा प्रथम क्रमांक प्राप्त झाला. तसेच रोहित सरोदे आणि भूषण सोनवणे यांनी सादर केलेल्या संगीतासाठी सर्वोत्कृष्ट संगीताचा प्रथम क्रमांक मिळाला. अभिनय क्षेत्रात सतीश वराडे यांनी उत्कृष्ट अभिनय (पुरुष गट) मध्ये द्वितीय क्रमांक पटकावला.

या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन करत त्यांच्या परिश्रमांचे कौतुक केले. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, कला व मानवविद्या प्रशाळेचे संचालक डॉ. राम भावसार, डॉ. सुचित्रा लोंढे आदी मान्यवर उपस्थित होते.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २ फेब्रुवारी, २०२६

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता